वन विभागांतर्गत विविध योजनांची आखणी
आणि अंमलबजावणीबाबत लोकसंवाद.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन निर्णय क्रमांक :- साववि-२०१९/प्र.क्र.९०/फ-११
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : -५ सप्टेंबर, २०१९.

प्रस्तावना : -

वन विभागाने गेल्या साडेचार वर्षामध्ये वन, वन्यजीव, जैवविविधता, वृक्ष लागवड व संगोपन, सामाजिक वनीकरण, पर्यावरण आणि निसर्ग या क्षेत्रांच्या संरक्षणासाठी आणि विकासासाठी अनेक महत्वाकांक्षी आणि लोकाभिमुख निर्णय घेतले आहेत. धोरण निश्चितीमध्ये व अंमलबजावणीमध्ये जनतेबरोबर सातत्याने संवाद आणि संपर्क असल्याशिवाय योजनांची यशस्वीपणे अंमलबजावणी होण्यामध्ये अनेक अडचणी येत असतात.

त्याशिवाय जनकल्याणासाठी ज्या योजना आणि कार्यक्रम तयार करणे नियोजित असते, त्यांची आखणी करण्यापूर्वी तळस्तरावरील जनतेची मते जाणून घेणे गरजेचे असते. अशा रितीने लोकांशी सातत्याने विचारांचे आदान प्रदान, संवाद आणि संपर्क झाल्यास उत्तम कार्यक्रम आणि योजना तयार करता येणे सुलभ होते. तसेच अशा योजना वेगाने जनसामान्यापर्यंत पोहचविता येतात.

वर नमुद केल्याप्रमाणे जनतेशी संवाद झाल्यास लोकाभिमुख शासन निर्मितीमध्ये खूप मोठे योगदान मिळविता येऊ शकेल.या सर्वांचा विचार करुन राज्यातील प्रत्येक तालुकास्तरावर जनतेशी दर ६ महिन्यांनी संवाद साधून वन विभागाच्या विविध क्षेत्रामध्ये त्यांचा सहभाग मिळविण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय : -

प्रस्तावनेमध्ये नमूद केलेल्या बाबी विचारात घेऊन प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी जनतेबरोबर दर ६ महिन्यांनी लोकसंवाद कार्यक्रम आयोजित करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

२. अशा कार्यक्रमामध्ये किमान १०० व्यक्तिंचा सहभाग असावा. त्यामध्ये खालील क्षेत्रातील व्यक्तींना प्रामुख्याने सहभागी करुन घेण्यात यावे.

१. ग्रामपंचायतींचे सरपंच / उपसरपंच व इतर पदाधिकारी.
२. संयुक्त वन व्यवस्थापन समित्या/ग्राम परिस्थितीकीय विकास समित्यांचे पदाधिकारी.
३. वन, वन्यजीव, सामाजिक वनीकरण, जैव विविधता, वृक्ष लागवड व संगोपन, निसर्ग व पर्यावरण व त्याशिवाय वनक्षेत्राशी निगडीत इतर घटक यामध्ये काम करणाऱ्या खाजगी व अशासकीय संस्थांचे पदाधिकारी.

४. तालुका पंचायत समित्या/नगरपालिका/नगरपंचायत यांचे पदाधिकारी.

५. तालुका पंचायत क्षेत्रातील जिल्हा परिषद सदस्य.

६. शेतकरी.

७. इतर संबंधित सामाजिक घटक (Stakeholder)

३. लोकसंवादामध्ये मुख्यत्वेकरुन खालील विषयांबाबत चर्चा, विचारविनिमय व संवाद व्हावा.

१. राज्यातील वनक्षेत्र ३३ टक्के पर्यंत नेण्यासाठी तालुका स्तरावरील वृक्ष लागवड संगोपन आराखडा व अंमलबजावणी.

२. मनुष्य-वन्यप्राणी संघर्ष कमी करण्यासाठीच्या योजनांची अमंलबजावणी व नविन योजनांची आखणी.

३. ग्रामस्तरावर लोक जैव-विविधता रजिस्टर (Public Bio-diversity Register) (PBR) तयार करण्यासाठी व जैव-विविधता संवर्धनामध्ये लोकसहभाग.

४. संयुक्त वन व्यवस्थापन समित्या / ग्रामीण परिस्थितीकीय विकास समित्या यांनी वन, वन्यजीव, जैवविविधता, सामाजिक वनीकरण व इतर संबंधित क्षेत्रामध्ये दर्जेदार, कार्यक्षमरित्या काम करुन या क्षेत्रांची उन्नती व विकास साधणे.

५. वन क्षेत्रातील विविध योजना व कार्यक्रमांद्वारे रोजगार निर्मिती, उत्पन्नवृध्दी आणि उपजिविकेची साधने निर्माण करणे.

६. वन विभागांतर्गत विविध योजना लोकांपर्यंत नेणे व त्याचा फायदा त्यांना मिळवून देणे.

७. लोकसहभागातून वन संरक्षणा संबंधी उपाययोजना जसे अवैध वृक्षतोड, शिकार, वन वणवा, चराई आणि अतिक्रमण.

८. वन हक्क कायदा २००६ संदर्भातील तरतूदी.

९. स्थानिक परिस्थितींशी अनुरूप इतर विषय.

४. या कार्यक्रमाचे आयोजन संबंधित तालुक्याचे वनक्षेत्रपाल (प्रा.) /सामाजिक वनीकरण /वन्यजीव यांनी संयुक्तपणे करावयाचे आहे. तथापि, संबंधित वनक्षेत्रपाल (प्रा.) हे तालुकास्तरावर व उपवनसंरक्षक (प्रा.) हे जिल्हास्तर/वन विभाग स्तरावर या कार्यक्रमाचे समन्वय अधिकारी राहतील. संबंधित सहाय्यक वनसंरक्षक (प्रा.) / सामाजिक वनीकरण /वन्यजीव यांनी या कार्यक्रमास उपस्थित राहून मार्गदर्शन करावे. त्याशिवाय संबंधित उप वनसंरक्षक (प्रा)/ विभागीय वन अधिकारी (प्रा.)/ उपविभागीय वनअधिकारी (प्रा.), मुख्य वनसंरक्षक/वनसंरक्षक (प्रा.)/ वन्यजीव, वनसंरक्षक, सामाजिक वनीकरण, पालक अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक यांनी देखील शक्य त्या ठिकाणी अशा कार्यक्रमांना उपस्थित राहून सहभागी व्यक्तींना मार्गदर्शन करावयाचे आहे.

५. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (शिक्षण, प्रशिक्षण व संशोधन), पुणे यांनी या साठी प्रत्यक्ष तालुकानिहाय असे कार्यक्रम घेण्यापूर्वी राज्य, वृत्त, जिल्हा, तालुका स्तरीय संबंधित अधिकाऱ्यांचे पूर्व प्रशिक्षण आयोजित करावे. परंतु, विभागातील अधिकाऱ्यांसाठी प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यास काही वेळ लागत असल्यास त्यासाठी सदर कार्यक्रम आयोजित करण्याचे थांबवू नयेत. दोन्ही बाबी एकाच वेळी सुरू राहतील असे पहावे.

६. प्रशिक्षण कार्यक्रम एकसारखा (**Uniformity in conducting training**) असावा यासाठी मार्गदर्शक पुस्तिका (**Manual**) तयार करावी.

७. प्रशिक्षण कार्यक्रमात विषयानुरूप पीपीटी/सादरीकरणाचे नमुने प्रमाणित (**standardized**) स्वरूपाचे असावेत. जेणेकरून सर्व ठिकाणी एकाच धर्तीवर प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करणे सोपे आणि सुलभ होईल.

८. प्रशिक्षण कार्यक्रमामध्ये विषयानुरूप उपस्थित होणारे संभाव्य प्रश्नांची (**FAQ**) यादी तयार ठेवावी. त्यामुळे प्रशिक्षण कार्यक्रमामध्ये उपस्थित होणाऱ्या प्रश्नाबद्दल त्वरीत उत्तरे देऊन संबंधितांचे समाधान करणे शक्य होईल.

९. प्रशिक्षण कार्यक्रमातंर्गत वाटप करावयाचे प्रसिद्धी आणि प्रचार साहित्य व सामुग्री सोप्या, सुटसुटीत भाषेत आणि स्थानिक विषयाशी अनुरूप असावे. सदर कार्यक्रमात विभागीय वन अधिकारी (प्रसिध्दी) पुणे व नागपूर यांचा देखील सहभाग घेण्यात यावा. त्यांच्याकडील वाहनांद्वारे व्हिडिओ फिल्म्स व इतर प्रसिध्दी साहित्य दाखवावे.

१०. प्रशिक्षण कार्यक्रमासाठी कोणते अधिकारी कोणत्या ठिकाणी मार्गदर्शनार्थ जातील याची यादी अगोदरच प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), नागपूर यांच्या कार्यालयामार्फत तयार करण्यात यावी.

११. प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी दर ६ महिन्यांला लोकसंवाद कार्यक्रमात शक्य त्यावेळी प्रधान सचिव (वने), प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), नागपूर, प्रधान मुख्य वनसंरक्षक सामाजिक वनीकरण, पुणे, व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र वन विकास महामंडळ, प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) यांपैकी कोणतेही अधिकारी उपस्थित राहतील व मार्गदर्शन करतील.

१२. प्रत्येक सहामाही बैठकांमध्ये नवीन लोकांशी संवाद साधण्यात यावा. त्यानुसार निमंत्रितांची यादी अतिशय काळजीपूर्वक तयार करण्यात यावी.

१३. तालुकास्तरावरील एका कार्यक्रमाच्या आयोजनासाठी साहित्य, सामुग्री, ध्वनीक्षेपण व्यवस्था आणि इतर सर्वसाधारण खर्च मिळून कमाल रुपये २०,०००/- (वीस हजार रुपये) खर्च अपेक्षित आहे. त्यानुसार ३५८ तालुक्यासाठी दरवर्षी रु.१.४३ कोटी इतका खर्च अपेक्षित आहे.

१४. सदर कार्यक्रमाची अंमलबजावणी या आर्थिक वर्षापासून म्हणजे २०१९-२० पासून तात्काळ सुरु करण्यात यावी. सन २०१९-२० मध्ये या कार्यक्रमासाठी उर्वरित कालावधीसाठी रु. ७० लक्ष इतक्या खर्चास मान्यता देण्यात येत आहे.

सदर खर्च जाहिरात, प्रचार व प्रसिध्दी (२४०६-८५८९) या मुख्य लेखार्शिर्षाखाली दरवर्षीच्या मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

१५. या कार्यक्रमाची अंमलबजावणी यापूढे दरवर्षी कायमस्वरुपी करण्यात यावी.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०९०६१११३०९८५१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

VIRENDRA RAMBAHAL TIWARI

Digitally signed by VIRENDRA RAMBAHAL TIWARI
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=a95e1a9759002ee190cd79464daaba7dc840ec375cd62a646a64986631086810, postalCode=400032, street=R AND F D,4TH FLOOR,MANTRALAYA,MUMBAI, ou=FOREST DEPARTMENT, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=VIRENDRA RAMBAHAL TIWARI
Date: 2019.09.06 11:20:34 +05'30'

(वीरेन्द्र तिवारी)

अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (मंत्रालय)

प्रत,

१. मा. विरोधी पक्षनेता, विधान परिषद / विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.

२. सर्व सन्माननीय विधानसभा, विधान परिषद व संसद सदस्य.

३. मा. मुख्य सचिव.

४. मा. राज्यपाल महोदयांचे सचिव, राजभवन, मुंबई.

५. मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव.

६. अपर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग.

७. अपर मुख्य सचिव (नियोजन), नियोजन विभाग.

८. सर्व प्रशासकीय विभागांचे अप्पर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/सचिव.

९. सर्व मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव / स्वीय सहायक.

१०. प्रधान मुख्य वनसंरक्षक, (वनबल प्रमुख),नागपूर.

११. प्रधान मुख्य वनसंरक्षक, सामाजिक वनीकरण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.

१२. व्यवस्थापकीय संचालक, वन विकास महामंडळ, नागपूर.

१३. सर्व प्रधान मुख्य वनसंरक्षक.

१४. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर.

१५. सर्व अप्पर प्रधान मुख्य वनसंरक्षक.

१६. सर्व विभागीय आयुक्त (महसूल).

१७. सर्व जिल्हाधिकारी.

१८. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद.

१९. सर्व महानगरपालिकांचे आयुक्त.

२०. सर्व मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक).

२१. सर्व उप वनसंरक्षक (प्रादेशिक).

२२. वनसंरक्षक, सामाजिक वनीकरण वृत्त, कोकण ठाणे, पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती, नागपूर .

२३. सर्व प्रशासकीय विभागांचे विभाग प्रमुख.

२४. सर्व मुख्याधिकारी, नगरपालिका/ नगर पंचायत.

२५. सर्व विभागीय वन अधिकारी, सामाजिक वनीकरण विभाग, (सर्व जिल्हे)

२६. महालेखापाल, (लेखापरीक्षा / लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १ व २ , मुंबई व नागपूर,

२७. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,

२८. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई -४०० ०३२.

२९. सर्व महामंडळे / मंडळे, शासकीय उपक्रम.

३०. निवासी परिक्षा लेखा अधिकारी,मुंबई.

३१. वित्त विभाग, व्यय-०९, अर्थसंकल्प- ०६ मंत्रालय, मुंबई-३२.

३२. कार्यासन अधिकारी, फ-२,फ-७,महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.

३३. कार्यासन अधिकारी, ब-१,महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.

३४. सह सचिव/उप सचिव/अवर सचिव (सर्व), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.

३५. निवडनस्ती/फ-११.

****